# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. झोपुप्रा/तां-२/अंभोप्र/मा.क्र.२६/९९४/२०२३
दि. ०६/०६/२०२३.

३४६
०७/०६/२०२३

## भोगवटा प्रमाणपत्र (इमारत A व B करिता)

वाचा - १) इमारत A व B बांधकाम परवानगी दाखला जा.क्र. झोपुप्रा / १९५ / २०१४ दि. ३१/०१/२०१४.

२) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र. झोपुप्रा / स.सं.न.र. / मा.क्र.९२ /१२६३ / २०२० दि. २१/१०/२०२०.

३) योजनेचे विकसक यांचे दि.१९/०४/२०२३ व दि.२९/०५/२०२३ रोजीचे पत्र.

४) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता दि. ०१/०६/२०२३.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ४५ प्रमाणे पुणे पेठ सि.स.नं. १२१६/३ (भाग),१० फा.प्लॉ.क्र.५७६/३ (भाग), १०, टी.पी.स्कीम नं. १ भांबुर्डा, शिवाजीनगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारत A व B येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून जा.क्र. झोपुप्रा / स.सं.न.र. / मा.क्र.९२ /१२६३ / २०२० दि. २१/१०/२०२० अन्वये सुधारित बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे A व B इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्याने योजनेचे विकसक यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या A व B इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मान्यतेनुसार देणेत येत आहे.

मंजूर बांधकाम नकाशानुसार इमारत निहाय तरतुद पुढीलप्रमाणे आहे.

इमारत A- (पुनर्वसन + विक्री)

| अ.क्र. | मजले | मंजूर नकाशानुसार | | | | एकूण सदनिका / दुकाने |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुनर्वसन घटक | | विक्री घटक | | |
| | | Resi. | Comm. | Resi. | Comm. | |
| १) | बेसमेंट फ्लोअर + लोअर ग्राउंड | पार्किंग | | | | पार्किंग |
| २) | ग्राउंड फ्लोअर | सोसायटी ऑफिस + १ टॉयलेट + पार्किंग | दुकान क्र. | -- | -- | १ सोसायटी ऑफिस + १ टॉयलेट + पार्किंग |
| ३) | पहिला | सदनिका क्र. १०१ ते ११० + ०१ बालवाडी + ०१ वेलफेअर सेंटर | --- | -- | -- | १० सदनिका+ ०१ बालवाडी + ०१ वेलफेअर सेंटर |
| ४) | दुसरा | सदनिका क्र. २०१ ते २१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| ५) | तिसरा | सदनिका क्र. ३०१ ते ३१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| ६) | चौथा | सदनिका क्र. ४०१ ते ४१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| ७) | पाचवा | सदनिका क्र. ५०१ ते ५१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| ८) | सहावा | सदनिका क्र. ६०१ ते ६१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| ९) | सातवा | सदनिका क्र. ७०१ ते ७१२ | -- | -- | -- | १२ सदनिका |
| १०) | आठवा | सदनिका क्र. ८०१ ते ८१० + Refuge area | -- | -- | -- | १० सदनिका+ Refuge area |
| ११) | नववा | सदनिका क्र. ९०५ ते ९०६ | -- | सदनिका क्र. ९०१ ते ९०४, ९०७ ते ९१२ | -- | १२ सदनिका |
| | एकूण | ९४ | --- | १० | --- | १०४ सदनिका |

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

पुनर्वसन घटक सदनिका :-

निवासी सदनिका :- ९४ सदनिका

बिगर निवासी सदनिका :- निरंक

एकूण :- ९४ सदनिका + १ बालवाडी + १ वेलफेअर सेंटर + १ सोसायटी ऑफिस + १ टॉयलेट + बेसमेंट फ्लोअर + लोअर ग्राउंड पार्किंग + ग्राउंड फ्लोअर पार्किंग

विक्री घटक सदनिका :-

निवासी विक्री सदनिका :- १० सदनिका

बिगर निवासी सदनिका :- निरंक

एकूण :-१० सदनिका

इमारत B- (पुनर्वसन + विक्री)

| अ.क्र. | मजले | मंजूर नकाशानुसार | | | | एकूण सदनिका / दुकाने |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुनर्वसन घटक | | विक्री घटक | | |
| | | Resi. | Comm. | Resi. | Comm. | |
| १) | ग्राउंड फ्लोअर | १ सोसायटी ऑफिस + १ टॉयलेट + पार्किंग | दुकान क्र. | | | १ सोसायटी ऑफिस + १ टॉयलेट + पार्किंग |
| २) | पहिला | सदनिका क्र. १०२ ते १०६ + ०१ बालवाडी + ०१ वेलफेअर सेंटर | -- | सदनिका क्र. १०१ | -- | ०६ सदनिका+ ०१ बालवाडी + ०१ वेलफेअर सेंटर |
| ३) | दुसरा | सदनिका क्र. २०१ ते २०८ | -- | -- | -- | ०८ सदनिका |
| ४) | तिसरा | सदनिका क्र. ३०१ ते ३०८ | -- | -- | -- | ०८ सदनिका |
| ५) | चौथा | सदनिका क्र. ४०१ ते ४०८ | -- | -- | -- | ०८ सदनिका |
| ६) | पाचवा | सदनिका क्र. ५०१ ते ५०८ | -- | -- | -- | ०८ सदनिका |
| ७) | सहावा | सदनिका क्र. ६०१ ते ६०८ | -- | -- | -- | ०८ सदनिका |
| ८) | सातवा | सदनिका क्र. -- | -- | सदनिका क्र. ७०१ ते ७०८ | -- | ०८ सदनिका |
| ९) | आठवा | सदनिका क्र. -- | -- | सदनिका क्र. ८०१ ते ८०८ | -- | ०८ सदनिका |
| | एकूण | ४५ | -- | १७ | -- | ६२ सदनिका |

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

पुनर्वसन घटक सदनिका :-

निवासी सदनिका :- ४५ सदनिका

बिगर निवासी सदनिका :- निरंक

**एकूण :- ४५ सदनिका + १ बालवाडी + १ वेलफेअर सेंटर + १ सोसायटी ऑफिस + १ टॉयलेट + पार्किंग**

विक्री घटक सदनिका :-

निवासी विक्री सदनिका :- १७ सदनिका

बिगर निवासी सदनिका :- निरंक

**एकूण :-१७ सदनिका**

Slum Rehabilitation Authority Technical Department Pune-Pimpri-Chinchwad Area APPROVED

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी उक्त इमारतीच्या बांधकामास योजनेचे सबंधित आर्कीटेक्ट यांनी दिलेल्या पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व विकसक यांनी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र व विहित नमुन्यातील हमीपत्राचे आधारे खालील नमुद अटी व शर्तीस अधीन राहून **भोगवटा प्रमाणपत्र** देणेत येत आहे.

अटी:-

१) प्रस्तुत बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तीचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) मंजुर नकाशानुसार इमारतीचे सर्व बाजुने असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

६) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

७) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, योजनेतील विक्री घटक इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

८) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील तरतुदीनुसार सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

९) सदर योजनेकरिता विकसक यांनी सादर केलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रानुसार पाणी पुरवठा विभाग/ग्रामपंचयतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास सदर योजनेतील सदनिका हस्तांतरण करणेपुर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता करणे विकसकावर बंधनकारक राहिल.

१०) सदर इमारती संदर्भात गळतीबाबत कोणतीही समस्या उद्भवल्यास सर्वसाधारणपणे ५ वर्षांपर्यंत त्याची सर्वस्वी जबाबदारी विकसक यांची राहिल.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

शिवराम शिताफ

शिवराम.तु. शिताफ
**प्र. सहायक संचालक नगररचना**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे.

प्रत :- १) **विकसक मे. नमन डेव्हलपर्स, ११२५, शितल प्लाझा, मॉडेल कॉलनी, पुणे.**

२) **आर्कि. ओंकार असोसिएट्स,** २ तृप्ती अपार्टमेंट, भांडारकर, रोड, पुणे-०४.

३) **तहसिलदार,ताबा विभाग,** झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव.

४) **संगणक अधिकारी,** झोपुप्रा, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.